# चोरटी तोड

## व त्याला आळा घालण्याचे संभाव्य उपाय

स्थाई आदेश कमांक — ३७     प्रकरण कमांक — ९

पुणे कमांक १, दिनांक ३०, ऑक्टोबर १९६४

जंगलातील चोरट्या तोडिचे प्रमाण एक सारखे वाढत असुन, या समस्येने उग्र स्वरूप धारण केले आहे. असे निदर्शनास येत आहे. ही परिस्थीती निर्माण होण्याकरीता आपली वनसंरक्षणाच्या जागरूकते बद्दल उणिव व परिणामकारक नसलेली गस्त, या बाबी मुख्यत्वेकरून कारणीभुत आहेत. दरवर्षी पकडण्यात येणाऱ्या गुन्हयांची संख्या व त्यामधिल वनउपजाचे परिणाम याचा आढावा घेतल्यास जंगल संरक्षणाच्या कार्यक्षमते बद्दलचा आपला दुबळेपणा दृष्टीस येतो. पुष्कळसे गुन्हे हे दुर्लक्षतेमुळे किंवा गावांतच गस्तीचे काम केल्याचे दिसून येते.

२. वनाचे पुर्णपणे व खात्रीलायक संरक्षण होण्याच्या दृष्टीने संरक्षण अंमलदारांनी त्यांच्या ताब्यातील वनांत जागरूकतेने गस्त घालने व <u>संबंधीत अधिकाऱ्यांनी सर्व स्तरावर परिणामकारक देखरेख व नियंत्रण ठेवणे हे फार जरूरी आहे</u>. जरी वनगुन्हयातील अपराधी पकडल्या गेला असो वा नसो किंवा त्यातील वनउपज मिळाले असो वा नसो, प्रत्येक वनगुन्हया बाबतची माहिती तत्परतेने कळविणे फार आवश्यक आहे. शोधून काढलेल्या गुन्हयांची संख्या, पकडलेले गुन्हेगार व वनउपज यातूनच प्रत्येक स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या कामाची लायकी ठरविण्यात येईल. <u>वनांचे चांगल्या रीतीने संरक्षण व त्याबद्दल कडक उपाय योजण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे सुचणा मार्गदर्शनार्थ व काटेकोर अंमलबजावणीसाठी देण्यात येत आहेत</u>.

(अ) <u>वनाच्या संरक्षणाची प्राथमिक जबाबदारी ही संरक्षण कर्मचाऱ्यावर असते</u> कारण तेच बहुधा गुन्हे पकडून त्यांची नोंद घेतात व त्याबद्दलची सुचना पाठवितात. <u>अशा प्रत्येक वर्गातील कर्मचाऱ्यांचे कर्तव्य व ते पार पाडण्याकरीता त्यांच्यावर असलेली जबाबदारी याबाबत विस्तीर्ण खुलासा खाली देण्यात आला आहे</u>.

(ब) वनरक्षक (बिटगार्ड) :— प्रत्येक बिटगार्डनि आपल्या अधिकार क्षेत्रातील जंगलात प्रामाणिकपणे गस्त घातला पाहिजे. त्याने आपल्या अधिकार क्षेत्रातील संपुर्ण वनांचे बारकाईने निरीक्षण प्रत्येक पंधरवाड्यात केले पाहिजे. त्यांच्या ताब्यातील जंगलात आढळलेल्या सर्व नुकसानी बाबत, गुन्हेगार व माल मिळाला असो किंवा नसो, प्राथमिक सुचना रिपोर्ट, तातडीने नोंदला गेला पाहिजे. ज्या प्राथमिक गुन्हा सुचनामध्ये योग्य काळात गुन्हेगारांचा शोध लागला नाही किंवा माल मिळाला नाही त्यांना उघडकिस न आलेली प्रकरणे म्हणून ठरविण्यात येईल. अशा प्रकरणात आलेल्या नुकसानीबद्दल जर बिट वनरक्षकाचा घोर निष्काळजीपणा कारणीभुत आहे हे सिध्द होते, तर त्याप्रमाणे नुकसानीची पुर्ण किंवा अंशत रक्कम अशा प्रकरणाचा निर्णय लावतेवेळी बिट वनरक्षकाकडून वसुल करण्यांत येईल. दैनंदिनीमध्ये त्यांनी केलेल्या रोजच्या निरीक्षणा बद्दलच्या माहितीची नोंद केलीचा पाहिजे. प्रत्येक पंधरवाड्यातील त्याच्या निरीक्षण अहवाल नोंदविला गुन्हा प्रकरणे व त्यामधील वन उपजेमुळे सरकारचे झालेले नुकसान या

बाबींची माहिती व्यक्तशिरपणे संबंधीत परिक्षेत्राधिकाऱ्याकडे पाठविलीच पाहिजे. वनरक्षकाने जर जंगलाची झालेली नुकसानी आपल्या पंधरवाडी अहवालात दिले नाही व त्यानंतर जर ही नुकसानी क्षेत्र सहाय्यक किंवा इतर कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेत आली, तर वनरक्षकाने चोरटया तोडिमुळे झालेली नुकसानी जाणुनबुजुन दाबुन ठेवली असे मानुन त्याच्या विरूध्द शिस्तभंगाची कडक कारवाई केली जाईल. निदर्शनास आलेल्या नुकसानीची पुर्णपणे नोंद करून चोरटया तोडिच्या झाडांच्या बुंदयावर अशा गुन्हेगाराकरीता असलेल्या हातोडयांचे निशान लावुन अनुक्रम कमांक लिहावा व त्या अनुक्रमकाचा संबंध त्याचा प्राथमिक गुन्हा सुचनेशी जोडला जाईल. प्राथमिक गुन्हा सुचना कळविण्याची जबाबदारी संबंधीत वनरक्षकाची राहील.

(क) प्रत्येक वनरक्षक त्याच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या जंगलाच्या पहिल्या निरीक्षणात दिसलेल्या संपुर्ण नुकसानीची अहवाल पाठविल या अहवालात एक महिण्याच्या आतील १ ते ६ महिण्यातील, ६ ते १२ महिण्यातील व १ वर्षाचे वरील चोरटया तोडिचा समावेश राहील. त्यानंतरच्या प्रत्येक अहवालात प्रत्येक पंधरवाडयांत दिसलेल्या नुकसानीची अंतर्भाव राहील.

(ड) बदली झाली असतांना नवीन वनरक्षक बिटचा कार्यभार घेण्याच्या अगोदर देखील जुन्या वनरक्षकांना सोबत घेवून संपूर्ण बिटचे पुर्णपणे निरीक्षण करून आढळून आलेल्या नुकसानीची यादी बनविल व त्यावर दोघेही सही करतील. पुर्वीचा वनरक्षक त्याच्या काळातील नुकसानी बद्दल जबाबदार राहील. जर नविन वनरक्षक बिटचा कार्यभार घेण्याच्या अगोदर पुर्ण निरीक्षण करून नुकसानी कळविण्यास चुकला तर नुकसानीबद्दल त्याला जबाबदार धरण्यात येईल. बिट निरीक्षणांच्या अहवालाशिवाय बिटचा कार्यभार घेण्याचे काम पुर्ण होणार नाही. जर वनरक्षक कार्यभार न घेता सुटटीवर गेला तर त्या बिटातील नुकसानीची नोंद त्याच्या गैरहजेरीत केली जाईल व त्या नुकसानीबद्दल त्याला जबाबदार धरण्यात येईल. क्षेत्र सहाय्यकाने (राऊंड ऑफिसर) अशी नुकसानी तपासुन पाहिली पाहिजे.

(ख) क्षेत्र सहाय्यक (राऊंड ऑफिसर) :– प्रत्येक क्षेत्र सहाय्यकाने प्रत्येक बिटाचे पुर्णपणे निरीक्षण दर तीन महिण्यांनी केले पाहिजे. वनरक्षकाने न कळवलेली नुकसानी तपासुन त्यांची त्याने नोंद करावी. ज्या भागाचे निरीक्षण केले असेल त्या बद्दलचे अहवाल तो व्यक्तशिरपणे त्याच्या वनक्षेत्राधिकाऱ्या मार्फत (रेंज फॉरेस्ट ऑफिसर) विभागीय वन अधिकारी यांना सादर करील. जर चोरटि तोड कळविण्यास तो चुकला तर त्याला वनरक्षकाबरोबर त्या चोरटया तोडिबद्दल जबाबदार धरण्यात येईल. फार मोठया प्रमाणावर झालेली चोरटी तोड कळविली नसेल किंवा त्यामधील गुन्हेगारांचा व मालाचा शोध लागला नसेल, तर तो आपल्या वनक्षेत्राधिकाऱ्या मार्फत विभागीय वन अधिकाऱ्याकडे खास अहवाल पाठविल. त्याने शोधून काढलेल्या चोरटया तोडिबाबत तो प्राथमिक गुन्हा सुचना नोंदविल.

(ग) वनक्षेत्राधिकारी (रेंज फॉरेस्ट ऑफिसर) :– <u>क्षेत्र सहाय्यक व वनरक्षक वनांत बरोबर गस्त करतात याची खात्री करून घेणं ही वनक्षेत्राधिकाऱ्यांची प्राथमिक जबाबदारी आहे.</u> जेथे चोरटी तोड होण्याची शक्यता आहे अशा भागाचे तेथे काम चालले असो वा नसो, नेहमी निरीक्षण केले पाहिजे. प्रत्येक बिटांच्या १/४ क्षेत्राचे निरीक्षण दर सहा महिण्याला करावयाचा त्याने प्रयत्न केला पाहिजे. त्या निरीक्षणाचा अहवाल त्याने व्यक्तशीरपणे आपल्या विभागीय वन अधिकाऱ्यांना पाठविला पाहिजे. कर्मचाऱ्यांनी पध्दतशिरपणे संपुर्ण

निरीक्षण केले आहे. गुन्ह्यांचा शोध लावला आहे. व त्यांची नोंद घेऊन माल जप्त केला याबद्दल त्याने त्यांच्या दैनंदिनी व नियतकालीन अहवालावरून खात्री करून घेतली पाहिजे.

(य) जर मोठया प्रमाणात चोरटी तोड असेल तर बाजुच्या क्षेत्र सहाय्यक व वनरक्षकांच्या मदतीने बिटाचे संपुर्ण निरीक्षण करण्याची उपाययोजना त्याने तत्परतेने केली पाहिजे. अत्यंत निकडिच्या प्रसंगाशिवाय व खास कारणाशिवाय वनरक्षकांना त्यांच्या बिटांच्या बाहेर कामाकरीता पाठवु नये.

(य) मोठया प्रमाणात चोरटया तोडी न होण्याबाबत जर पुरेशी तत्पर उपाययोजना केली नाही तर त्या तोडीबद्दल वनक्षत्राधिकाऱ्याला जबाबदार धरण्यात येईल.

(र) उपविभागीय वनधिकारी व विभागीय वन अधिकारी :– राजपत्रीत अधिकाऱ्यांनी दौऱ्यात चोरटी तोड होण्याची फार शक्यता असलेल्या खास रकब्याचे निरिक्षण केलेच पाहिजे. कुपाचे निरीक्षण संरक्षणाच्या दृष्टीने बारकाईने केले पाहिजे. काम न केलेल्या रकब्यातसुध्दा अत्यंत दक्षतेने पाहणी केली पाहिजे. नेहमीच्या निरीक्षणाव्यतीरीक्त चोरटया तोडिच्या निरीक्षणाकरीता पंधरवाडयातुन कमीत कमी एक दिवस तरी घालवावा.

(ल) परिक्षेत्राधिकारी व क्षेत्रसहाय्यकांचे निरीक्षण अहवाल बारकाईने तपासावे व खात्री करावी कि, कळविल्या सर्व प्रकरणात तत्परतेने योग्य ती कारवाई केली आहे व बिटांचे नियमीतपणे निरीक्षण होत आहे.

(व) उघडकिस न आलेल्या चोरटया तोडिच्या प्रकरणाचा निकाल लावतांना त्याबद्दल कोण जबाबदार आहे हे ठरवून ज्यांच्या दुर्लक्षतेमुळे किंवा कानाडोळा करण्यामुळे नुकसानी झाली, त्यांचे कडून नुकसानी वसुल करण्याबद्दल कारवाई करावी. आपल्या दौऱ्यात त्यांनी सर्वांचे प्राथमिक गुन्हा सुचना पुस्तक व केस रजिस्टर तपासावे व गुन्हे कळविले जातात व तत्परतेने त्याबद्दल पुढील कारवाई करण्यात येते की नाही याची खात्री करावी. वनांच्या संरक्षणाची योग्य रीतीने व्यवस्था करण्याची जबाबदारी शेवटी विभागीय वन अधिकाऱ्यांचीच आहे.

स्वाक्षरी
श्री. स. बुट
मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, पुणे